# गुलाबी थंडीसह प्रचारालाही चढतोय रंग

## दर्यापूर मतदारसंघात 16 उमेदवार मैदानात | प्रचार कार्यालयांच्या उद्घाटनाचा सपाटा



### मतदारांमध्ये निरुत्साह

इतर निवडणूकांच्या तुलनेत या निवडणुकीत मतदारांमध्ये कमालीचा निरुत्साह आहे, जो राजकीय पक्षांना बुचकाळ्यात टाकणारा आहे. राजकीय पधाधिकाऱ्या शिवाय कार्यकर्त्यांची पाहीजे तशी गर्दी दिसुन येत नाही. घोडा, मैदान समोर असल्याने जनता कुणाला कौल देते हे येणारी 23 तारीखच ठरवेल यात शंका नाही.

### अशी आहे मतदारसंघाची स्थिती

40 दर्यापूर अंजनगाव विधानसभा मतदारसंघ हा एससी प्रवर्गासाठी राखीव आहे. 2019 लोकसभा निवडणूकीनुसार दर्यापूर मतदारसंघात एकुण मतदार 302467 आहे. दर्यापूर विधानसभा मतदारसंघात अनुसूचित जातीचे मतदार अंदाजे 72,199 आहेत, जे 2011 च्या जनगणनेनुसार सुमारे 23.87 टक्के आहे. तसेच मतदारसंघात अनुसूचित जनजातीतील मतदारांची संख्या अंदाजे 14,458 आहे. जी 2011 च्या जनगणनेनुसार सुमारे 4.78 टक्के आहे. तर मुस्लिम मतदारांची संख्या अंदाजे 37,506 आहे, जी मतदार यादीच्या विश्लेषणानुसार सुमारे 12.4 टक्के आहे. ग्रामीण मतदारांची संख्या अंदाजे 225,973 आहे, जी 2011 च्या जनगणनेनुसार सुमारे 74.71 टक्के आहे. तसेच शहरी मतदार अंदाजे 76,524 आहेत जे 2011 च्या जनगणनेनुसार सुमारे 25.3 टक्के आहे.

**प्रविण बोके**

**अंजनगाव सुर्जी, ( दि.8 )–** जशीजशी गुलाबी थंडीमध्ये वाढ होत आहे, तसातसा दर्यापूर-अंजनगाव विधानसभा मतदार संघात निवडणूकीलाही रंग चढताना दिसत आहे. 32 उमेदवारांपैकी 16 उमेदवारांनी आपले नामांकन परत घेतल्याने आता 16 उमेदवार निवडणूक रिंगणात शिल्लक आहेत. चिन्ह वाटपानंतर राजकीय पक्षाचे व अपक्ष उमेदवार दोन्ही तालुक्यात आपआपल्या प्रचार कार्यालयांचे उद्घाटन करताना दिसत आहे. गुरुवारी (दि.8) शिवसेना (उबाठा) प्रमुख उध्दव ठाकरे यांची महासभा पार पडली. त्यानंतर आता इतर पक्षही अश्या सभेचे नियोजन करित आहे. दुसरीकडे पोटासोबत खिसाही भरल्या जात असल्याने कार्यकर्त्यांमध्ये उत्साह संचारताना दिसत आहे.

येत्या 20 नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे. आजपासून फक्त 10 दिवसांचा कालावधी प्रचारासाठी शिल्लक आहे. त्यामूळे उमेदवार प्रचारासाठी जंगजंग पछाडताना दिसत आहेत. शिवसेना (शिंदे गट) माजी आमदार कॅ.अभिजीत अडसूळ, शिवसेना उबाठाचे गजानन लवटे, युवा स्वाभिमान पक्षाचे माजी आमदार रमेश बुंदिले, प्रहार जनशक्ती पक्षाचे अरुण वानखडे, वंचित आघाडीचे अंकुश वाकपांजर या प्रमुख उमेदवारासह बसपा, रिपाई(ए) यासह अपक्ष उमेदवार आपले नशीब आजमवण्यासाठी मैदानात आहे. मतदारांपुढे आपले शक्तीप्रदर्शन दाखविण्याचा सर्वतोपरी प्रयत्न उमेदवारांकडून केला जाणार आहे. माझा पक्ष कसा आहे, माझ्या पक्षाने आपल्यासाठी काय केले आणि काय करणार अश्या अनेक आश्वासनाच्या खैराती मतदारांना वाटण्यात येईल. अमका उमेदवार किती सक्षम हे मांडणाऱ्या चर्चा जनसामान्यांच्या चर्चा पान टपरी, चहाच्या टपरीवर सुरु झाल्या आहे. अनेकजण दावे, प्रतिदावे करण्यात आघाडीवर आहे. 'धुतल्या तांदळाचा' म्हणावा असा एकही उमेदवार दिसत नसल्याने कुणाचे पारडे आतापासूनच जड आहे, हे सांगणे कठीण झाले आहे. परंतू महायूती मध्ये झालेली बंडखोरी आणि प्रहारने दिलेला सक्षम उमेदवार तसेच वंचीत बहूजन आघाडीचे उमेदवार 'गेम चेंजर' म्हणून चर्चेचा भाग बनत आहेत. कारण हे तीनही फॅक्टरमध्ये मतदार संघाचा आमदार कोण होणार, हे ठरविणार किंवा या तीघांपैकीच एक आमदार होणार का? हा येणारा काळच सांगेल.

# अंगाला गुंडाळला नऊ किलो गांजा

## शक्कल लावली तरी पोलीसांनी धरले



**महासागर प्रतिनिधी**


**अमरावती, (दि. 8) -** येथील पंचवटी चौकात उघड झाला. शहर गुन्हे शाखेच्या क्राईम युनिट दोनच्या पथकाने दोन तस्करांची झाडाझडती घेतली असता, त्यांच्या कपड्यांआड अंगाला कपड्यांत गुंडाळलेला 9 किलो 735 ग्रॅम गांजा आढळून आला. 7 नोव्हेंबर रोजी रात्री स्थानिक पंचवटी चौकात ही कारवाई करण्यात आली. याप्रकरणी दोघांना अटक करण्यात आली. सादिक शहा बिसमिल्ला शहा (40, लालखडी, इमाम नगर, अमरावती) व शेख महबुब शेख रूस्तम (60, रा.इतवारी बाजार, वर्धा) अशी अटक आरोपींची नावे आहेत.

गुन्हेशाखा युनिट दोनचे पथक आयुक्तालय हद्दीत पेट्रोलिंग करीत असतांना पंचवटी चौक येथे दोन इसम हे गांजाची तस्करी करून त्याची विकी करण्याचे उद्देशाने येत असल्याची माहिती त्यांना मिळाली. त्या आधारे, पंचवटी चौकात ट्रॅप रचण्यात आला. त्यावेळी वेलकम टि पॉईटकडून पंचवटी चौकात येत असलेल्या दोन संशयित इसमांना विचारणा करण्यात आली. त्यांची अंगझडती घेतली असता आरोपींच्या अंगात (कपड्यांच्या आत) पांढ-या रंगाच्या कापडामध्ये गांजा आढळून आला. आरोपींकडे आढळलेला 1 लाख 88 हजार 200 रुपये किमतीचा 9.735 किलो ग्रॅम गांजा व 12 हजार रुपये किमतीचे दोन मोबाईल असा एकुण 2 लाख 200 रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. दोन्ही आरोपींविरूध्द गाडगेनगर ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस आयुक्त नविनचंद्र रेड्डी, उपायुक्तत्रयी कल्पना बारवकर, गणेश शिंदे व सागर पाटील, सहाय्यक पोलीस आयुक्त शिवाजीराव बचाटे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हेशाखा युनिट दोनचे प्रमुख तथा पोलिस निरिक्षक बाबाराव अवचार यांच्या नेतृत्वाखाली सहायक पोलिस निरिक्षक योगेश इंगळे, उपनिरिक्षक संजय वानखडे, अंमलदार अजय मिश्रा, दिपक सुंदरकर, निखील माहोरे, चेतन कराडे, राजीक रायलीवाले, योगेश पवार, सागर ठाकरे, राहुल दुधे यांनी ही कारवाई केली.

# अवैध ऑनलाईन गेमिंगचा पर्दाफाश

## दुकान मालकासह चौघांविरुध्द गुन्हा दाखल

## आरोपीकडून 21 हजार 450 रूपयांचा मुद्देमाल



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 8) -** अवैधरित्या सुरू असलेल्या ऑनलाईन सेंटरवर पोलिसांनी कारवाई करून 21 हजार 450 रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. राजापेठ पोलिसांनी 7 नोव्हेंबर रोजी ही कारवाई केली. याप्रकरणात आरोपी ओम राजेद्र पराळे (38, रा. अप्सरा टॉकीज, यवतमाळ), विक्की राजु चवरे (30, रा. हरीदास पेठ, बडनेरा) व 03. एफाज अली वल्द हैदर अली (28, रा. ताज नगर, अमरावती) व दुकान मालक आकाश बबनराव पाटील (रा. पार्वती नगर नं 03, अमरावती) यांच्याविरुध्द कलम 7 लॉटरी अधीनियम सहकलम 4, 5 महाराष्ट्र जुगार कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

राजापेठ पोलिस खाजगी वाहनाने अवैधरित्या ऑनलाईन सेंटरवर कार्यवाही करण्याकरिता पेट्रोलींग करीत होते. दरम्यान गुप्त माहितीवरून पोलिसांनी हमालपुरा परिसरातील श्री हरी हॉटेल जवळ सुरु असणार्या गेमींग सेंटरवर जावुन पाहणी केली असता तेथे काही इसम हे लोंकांकडुन पैसे घेवुन ऑनलाईन गेमींगद्वारे हारजितचा खेळ खेळत असल्याचे दिसले. त्यामुळे पोलिसांनी तेथे उपस्थित असणारे ओम राजेद्र पराळे, विक्की राजु चवरे व ?फाज अली वल्द हैदर अली यांना विचारपूस केली. पोलिसांनी त्यांना मालकाबाबत विचारणा केली असता त्या ऑनलाईन सेंटरचे दुकान मालक आकाश बबनराव पाटील (रा. पार्वती नगर नं 03, अमरावती) असल्याचे आढळून आले. पोलिसांनी त्यालाही ऑनलाईन गेम सेंटरबाबत विचारणा केली असता त्याने या गेमिंगबाबत कोणतीही शासकीय परवानगी नसल्याचे सांगीतले. त्यामुळे पोलिसांनी ऑनलाईन गेम खेळाचे साहीत्य एकुण 21 हजार 450 रुपयांचा मुददेमाल जप्त केला. याप्रकरणात नमुद आरोपींविरूध्द गुन्हा नोंदविण्यात आला. सदर कारवाईदरम्यान पोलिसांनी एलईडी, डेलद्य कंपनीचे बोर्ड, वाय-फाय बॉक्स व केबल, एक एलईडीचे रिमोट, गेम बैंक्स, एक एक्सटेन्शन बॉक्स व 3 हजाराची रोख असा एकुण 21 हजार 450 रुपयांचा मुददेमाल जप्त केला. सदर कारवाई पोलिस आयुक्त नविनचंद्र रेड्डी, पोलिस उपायुक्त गणेश शिंदे, सहायक पोलिस आयुक्त जयदत्त भवर यांच्या मार्गदर्शनाखाली वरीष्ठ पोलीस निरीक्षक पुनीत कुलट, पोलिस उपनिरीक्षक मिलींद हिवरे, पोलिस हवालदार मनीष करपे, पंकज खटे, रवी लीखीतकर, गनराज राउत, सागर भजगवरे यांनी केली.

# येवदा बसस्थानकावर वाहकाला शिविगाळ

**अमरावती -** येवदा बस स्थानकावर बस वाहकाला शिविगाळ करून त्यांची कॉलर पकडण्यात आली. ही घटना 6 नोव्हेंबर रोजी रात्रीच्या सुमारास घडली. बस वाहक ललीतकुमार अशोकराव चिंचे (36, रा. दारापूर, ता. दर्यापूर) यांच्या तक्रारीवरून येवदा पोलिसांनी आरोपी निलेश ऊर्फ गोलु सुभाष मोहोड (रा. इंदिरानगर, येवदा) याच्याविरुध्द गुन्हा नोंदविला आहे. या घटनेचा पुढिल तपास येवदा पोलीस ठाण्याचे ठाणेदाराच्या मार्गदर्शनात पोलीस करीत आहे.

# विविध घटनेत तिघांचा मृत्यू

## एकाचा डोक्याला मार लागून, तर दोघांची गळफासाने आत्महत्या

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,(दि.8)-** शहरातील विविध परिसरातील तीन जणांचा आकस्मिक मृत्यु झाल्याची घटना 7 नोव्हेंबर रोजी उघडकीस आली. यामध्ये एकाचा डोक्याला मार लागून मृत्यू झाला, तर दोघांनी गळफास लावून आत्महत्या केली आहे. याप्रकरणात गाडगेनगर हद्दीतील दोघांचे तर वलगाव हद्दीतील एका व्यक्तीचा मृत्यू झाला आहे.

पहिली घटना गाडगेनगर हद्दीतील सिध्दार्थनगरात घडली. देविदास रतन खिराळे (62, रा. सिध्दार्थनगर) यांना डोक्याला मार लागल्याने त्यांना नागपूर येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. परंतू त्यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. तसेच राठीनगरातील रहिवासी प्रणव प्रदिप लादे (26) याने राहत्या घरी गळफास लावून आत्महत्या केली. तर वलगाव पोलिस ठाण्याच्या हद्दीतील खारतळेगाव स्थित एका झाडाला सुरेश नारायण जुमळे (47, रा. खारतळेगाव) यांनी आत्महत्या केली. या तिन्ही घटनेत पोलिसांनी आकस्मिक मृत्युची नोंद केली आहे.

# चांदुरबाजारातून दुचाकी लंपास

**अमरावती -** चांदुरबाजारातील सीसीबी संत्रा मंडी परिसरातून एका इसमाची दुचाकी लंपास केली. आबिद अली मकसूद अली (53, रा. ताजनगर, चांदुरबाजार) यांनी या घटनेची तक्रार 7 नोव्हेंबर रोजी चांदुरबाजार पोलिस ठाण्यात दिली. त्यानुसार पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुध्द गुन्हा नोंदविला. या घटनेचा पुढिल तपास चांदूर बाजार पोलीस ठाण्याचे ठाणेदाराच्या मार्गदर्शनात पोलीस करीत आहे.

# परतवाडा बसस्थानकात चेन स्नॅचिंग

**महासागर प्रतिनिधी**

**अचलपूर,(दि.8)-** परतवाडा बसस्थानकावर प्रवाशांच्या प्रचंड गर्दीचा फायदा घेत सक्रिय चोरट्यांनी शुक्रवारी एका महिलेच्या गळ्यातील सोनसाखळी चोरून नेली. महिला बसमध्ये चढत असताना ही घटना घडली. प्राप्त माहितीनुसार, भातकुली तालुक्यातील रामा सौर येथील रहिवासी रजनी चंद्रशेखर पुंडकर या शुक्रवारी पूर्णानगरला जाण्यासाठी परतवाडा बसस्थानकावर बसमध्ये चढल्या होत्या. दरम्यान, गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने त्यांच्या गळ्यातील आठ ग्रॅम सोन्याची चेन चोरून नेली. पोलिसांना घटनेची माहिती मिळताच त्यांनी घटनास्थळ गाठून तपास सुरू केला. परतवाडा बसस्थानकावर प्रवाशांना वारंवार दागिने, पर्स, मोबाईल सुरक्षित ठेवण्याचा सल्ला दिला जात असतानाही चोरीची ही घटना घडल्याने बसस्थानकातील सुरक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

# राज्य उत्पादन शुल्क विभागाची विविध कारवाया

## 117 गुन्ह्यात 109 आरोपींना अटक

### नाकाबंदी करुन वाहनांची तपासणी

विधानसभा निवडणूकीचा पार्श्वभूमीवर अमरावती येथील राज्य उत्पादन शुल्क, विभागाच्या वतीने महाराष्ट्र मध्यप्रदेश राज्य सीमेवर नाकाबंदी करण्यात आली होती. यामध्ये 6 सिमा तपासणीनाके उभारुन तेथे दिवसरात्र संशयीत वाहनांची तपासणी करण्यात येत आहे.

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,(दि.8) -** विधानसभा निवडणूकीची आचारसंहिता जारी झाल्यापासून राज्य उत्पादन शुल्क विभागाने कारवायांचा धडाका लावला आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अधिकारी व कर्मचार्यांनी गेल्या काही दिवसात अवैध दारू विक्री, निर्मीती व वाहतुकीबाबत 117 गुन्हे नोंदवून, 109 आरोपींना अटक केली आहे. या आरोपींच्या ताब्यातून सहा वाहनांसह 15 लाख 81 हजारांचा मूद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने अमरावती जिल्हयातील अवैध मद्य निर्मिती, विक्री व वाहतूकीवर राज्य उत्पादन शुल्क विभागाने लक्ष केंद्रीत केले आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधिकारी व कर्मचारी यांनी अमरावती शहरासह ग्रामिण भागात पेट्रोलिंग करून विविध ठिकाणी धाडसत्र राबविले. यामध्ये तब्बल 117 गुन्हे दाखल करण्यात आले असून, 109 आरोपी अटक करण्यात आलेले आहे. तसेच 6 वाहनासहित 15 लाख 81 हजारांचा मूद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

# जि.प. शाळेतून अंदाजे 60 हजारांचा मुद्देमाल लंपास

**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी (दि.8) -** मोर्शी येथील जिल्हा परिषद शाळेत अज्ञात चोरट्यांनी कॉम्पुटर लॅब मध्ये प्रवेश करून जवळपास 60,000 रुपयांचा मुद्देमाल लंपास केला. सदर घटना (दि.6) रात्री 2 वाजताचे सुमारास घडली असून, शिक्षणाच्या पवित्र ठिकाणाला सुद्धा चोरट्यांनी लक्ष केले. पोलिस सूत्राकडून मिळालेल्या माहितीनुसार पेठपुरा रस्त्यावरील पंचायत समिती कार्यालयाच्या मागे जिल्हा परिषद गव्हर्मेंट शाळा आहे. या शाळेतील शिपाई यांनी (दि.6). सायंकाळी 6 वाजता नेहमीप्रमाणे शाळा बंद करून घरी परतले होते. दरम्यान त्याच दिवशी मध्यरात्रीच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी संगणक कार्यालयाच्या प्लायवूडचे दार तोडून आत प्रवेश केला व संगणक कक्षातील डेस्कटॉप, कॉम्पुटर, प्रोजेक्टर यासह इतरही साहित्य मिळून जवळपास 60,000 रुपयांचा मुद्देमाल लंपास केला. सकाळी 7 वाजता (दि.7) शाळेचा शिपाई यांनी दररोज प्रमाणे शाळा उघडली असता शाळेत चोरी झाल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. लगेच त्यांनी या घटनेची माहिती दूरध्वनीवरून शाळेचे मुख्याध्यापक यांना दिली. शाळेचे प्रभारी मुख्याध्यापक संतोष जवंजाळ यांनी तात्काळ शाळेत धाव घेऊन बघितले असता संगणक कार्यालयातील साहित्य चोरीला गेल्याचे त्यांना आढळून आले. शाळेचे मुख्याध्यापक यांनी मोर्शी पोलिस स्टेशनला फिर्याद दाखल केली. या गंभीर प्रकरणाची दखल घेत मोर्शीचे ठाणेदार नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली स्कॉड विभागाचे पोलिस उपनिरीक्षक अमोल बुरकुल, पोलिस कॉन्स्टेबल स्वप्नील बायस्कर, छत्रपती करपते, विजय वागतकर यांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला.

# भाजपच्या पदाधिकाऱ्यांकडून 7.50 लाखांची रोख जप्त

## अचलपूर येथील चांदूर बाजार नाक्यावर कारवाई



### ती पांढरी स्कॉरपीओ कार सटकली ?

माहिती आहे की, यावेळी या वाहनासोबत दुसरे पांढरे स्कॉरपीओ वाहनसुध्दा असल्याची माहिती आहे. ज्यामध्ये मोठ्याप्रमाणात रक्कम होती, परंतू तपासणी नाक्यावर ऐनवेळी गडबड झाल्याने हे वाहन वेळीच सटकल्याची माहिती सुत्रांनी दिली आहे. प्रशासनाने मात्र या माहितीला दुजोरा दिला नाही.

**महासागर प्रतिनिधी**

**अचलपूर (दि.8)-** अचलपूर 42 विधानसभा मतदारसंघात विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2024 च्या अनुषंगाने एसएसटी टीम क्रमांक 2 व 3 ने चांदूर बाजार नाका चेक पोस्ट येथे वाहन तपासणीदरम्यान मोठी कारवाई करत भाजप पदाधिकाऱ्यांकडून 7.50 लाखांची रोख जप्त केली. ही कारवाई शुक्रवार (8 नोव्हेंबर) रोजी सायंकाळी 5=38 वाजता ही कारवाई करण्यात आली.

विधानसभा निवडणूकीच्या अनुषंगाने शहराच्या एंट्री पॉईंटवर तपासणी नाके कार्यान्वित करण्यात आले आहे. घटनेच्या वेळी अमरावतीहून येत असलेल्या एमएच 27/ बिझेड 6428 क्रमांकाच्या हुंडाई आय 20 कारची तपासणी करण्यात आली. यावेळी या कार मध्ये 7,50,000 रुपयांची रोख आढळून आली. या वाहनामध्ये परतवाडा येथील भाजप शहर अध्यक्ष कुंदन यादव, भाजप ग्रामीण अध्यक्ष विशाल काकड, अभिजीत पाटील आणि ऋषिकेश दुर्गे हे या वाहनातून प्रवास करत होते. ही रक्कम नेमकी कुणाची आणि कोठे जात होती, हे अद्याप स्पष्ट झाले नसल्याने ही रक्कम जप्त करुन सीलबंद पेटीत उपकोषागार कार्यालय, अचलपूर येथे जमा करण्यात आली. ही कारवाई एसएसटी टीमचे प्रमुख पंकज बोनखडे, पोलीस हवालदार संजय ठाकरे आणि पवन ठाकरे (ब.क्र.1115) यांनी केली. अचलपूरचे निवडणूक निर्णय अधिकारी बळवंत अरखराव आणि सहायक निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. संजय गरकल यांच्या मार्गदर्शनाखाली ही प्रक्रिया करण्यात आली. या जप्ती कार्यवाहीत नोडल अधिकारी मनीष देशमुख, लक्ष्मीकांत तिवारी, आचारसंहिता सहाय्यक परवेज पठाण आणि पथक समन्वयक अजय दाभणे यांचाही समावेश होता.

# आकाशात पहायला मिळणार चार दिवस आतषबाजी

## 17 ते 20 नोव्हेंबरदरम्यान सिंह तारकासमुहातून उल्कावर्षाव

### काय आहे उल्कावर्षाव ?

धूमकेतू सूर्याला प्रदक्षिणा घालून जात असतांना त्यातील काही भाग मोकळा होतो, धुमकेतूने मागे टाकलेले ते अवशेष असतात. या उल्का एकाद्या तारका समुहातून येत आहेत, असे वाटते. तासाला 60 किंवा त्यापेक्षा जास्त उल्का आकाशातील एकाद्या भागातून पडत असतील तर त्यास उल्का वर्षाव म्हणतात. काही वेळा गतिमान उल्का पृथ्वीच्या वातावरणातून खाली येताना त्या घनरुप अवस्थेत पृथ्वीवर येतात, त्यास 'अशणी' म्हणतात, बाह्य अवकाशातील वस्तूचे नमूने या अशणीमुळे मिळतात.



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 8) -** 17 ते 20 नोव्हेंबरदरम्यान सिंह तारकासमुहातून मोठ्या प्रमाणात उल्कावर्षाव होणार आहे. पहाटेच्या सुमारास याची शक्यता जास्त आहे. त्यामुळे आकाशात चार दिवस आतषबाजी पहायला मिळणार आहे. उल्कावर्षावाची तिव्रता, निश्चित तारीख, वेळ या गोष्टी खात्री सांगता येत नाही. घराबाहेर आणि भराभर उल्का पडतांना दिसल्या अशी अवास्तव कल्पना कोणी करु नये. उल्काचे निरीक्षण आणि त्याच्या नोंदीची खगोल जगतात खूप गरज आहे. या उल्का वर्षावाला 'लिओनिड्स' हे नाव आहे. अंधाऱ्या रात्री आकाशाचे निरीक्षण करीत असतांना एकाद्यावेळी क्षणार्धात एकादी प्रकाशरेषा चमकून जाताना आपणास दिसते या घटनेस तारा तुटणे असे म्हणतात. ही एक खगोलीय घटना आहे एखाद्यावेळी उल्का आपल्याला पडताना दिसते, या संदर्भात लोकांच्या अंधश्रद्धा आहे. परंतू अशा अंधश्रद्धेला खगोलशास्त्रात कोठेही आधार नाही. सिंह तारकासमुहातून होणारा हा उल्कावर्षाव 'टेम्पलटटल' या धूमकेतूच्या अवशेषामुळे होतो व हा धूमकेतू 33 वर्षांनी सुर्याला भेट देतो. सर्व खगोलप्रेमिंनी उल्का वर्षावाचे विलोभनीय दृष्य पहावे, असे आवाहन मराठी विज्ञान परिषदेचे अमरावती विभागीय अध्यक्ष प्रवीण गुल्हाने व हौसी खगोल अभ्यासक विजय गिरुळकर यांनी केले आहे.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# प्रत्येक गड-किल्ल्यावर मशीद असायला हवी...

## खासदार बळवंत वानखडे यांचे विधान, राज ठाकरेंवर केली टीका



**महासागर प्रतिनिधी**

**दर्यापूर,(दि.8)-** अमरावती येथील सभेत मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी मशिदीवरील भोंगे काढण्यावरून विधान केले. या विधानावर काँग्रेस खासदार बळवंत वानखेडे यांनी जोरदार टीका केली. राज ठाकरे यांचे हे वक्तव्य छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांना काळिमा फासणारे आहे असं खासदारांनी म्हटलं. दर्यापूर येथे महाविकास आघाडीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ उद्धव ठाकरे यांची जाहीर सभा होती. या सभेत बळवंत वानखेडे यांनी राज यांच्या विधानावर भाष्य केले. खासदार बळवंत वानखेडे म्हणाले की, काल राज ठाकरे आले होते, त्यांनी मशिदीवरील भोंगे काढण्याचं विधान केले. त्यांची ही घोषणा जुनीच आहे. परंतु वाईट या गोष्टीचे वाटते. त्यांच्या झेंड्यावर छत्रपती शिवरायांची मुद्रा आहे. छत्रपती शिवरायांना अपेक्षित होते, मंदिर असेल त्याच्या बाजूला मशीद असली पाहिजे. आपले जे गडकिल्ले आहेत तिथे मशीद असली पाहिजे हे धोरण छत्रपती शिवरायांचं होते. त्या शिवरायांच्या विचारांना काळिमा फासणारं विधान होते अशी टीका त्यांनी केली. त्याशिवाय बडनेरा मतदारसंघात मी हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचे बॅनर पाहिले, त्याबाजूला जिल्ह्यातील भाभीचे फोटो होते. बाळासाहेब ठाकरेंसोबत फोटो लावण्याची या लोकांना लाज कशी वाटत नाही. ज्यांनी मातोश्री बनवली. त्या मातोश्रीला त्रास देणे, उद्धव ठाकरेंना त्रास देणे हे काम त्यांनी केले. आजपर्यंतच्या उत्कृष्ट मुख्यमंत्र्यांपैकी उद्धव ठाकरे आदर्श मुख्यमंत्री होते. त्यांनी कोरोना काळात सर्वांना सोबत घेऊन केलेले काम, ही किमया त्यांच्यात होती. योगायोगाने काय झाले सगळ्यांना माहिती आहे. 50 खोके हे सगळ्यांना माहिती आहे असं सांगत खासदार बळवंत वानखेडे यांनी नवनीत राणांसह एकनाथ शिंदे आणि समर्थक आमदारांवर निशाणा साधला.

दरम्यान, उद्धव ठाकरेंचे मी आभार मानतो, त्यांच्या आशीर्वादाने मी आज लोकसभेत पोहचलो. खऱ्या अर्थाने त्यांचा आशीर्वाद मला लाभला. अमरावती जिल्ह्याची खासदारकी त्यांच्या वाट्याला होती. मात्र त्यांनी मला इथं उमेदवार केले त्यामुळे त्यांचे आभार मानतो. ही लढाई उद्धव ठाकरे, शरद पवार, राहुल गांधी यांचे हात बळकट करण्यासाठी आहे. राज्य वाचवण्यासाठी, देश वाचवण्यासाठी तसेच संविधान वाचवण्यासाठी ही लढाई आहे. आपल्याला महाविकास आघाडी सरकार आणणं गरजेचे आहे. जाहीरनामा प्रसिद्ध झाला आहे. जाहीरनाम्यातील प्रत्येक गोष्ट राबवण्यासाठी महाविकास आघाडी सज्ज आहे असा विश्वास खासदार बळवंत वानखेडे यांनी व्यक्त केला.

# समाजाचे ऋण फेडण्याकरिता जनसेवेची तळमळ!

## डॉ.नीलेश विश्वकर्मा : मतदारसंघात आशीर्वाद पदयात्रेला प्रचंड प्रतिसाद



**महासागर प्रतिनिधी**

**धामणगाव रेल्वे, (दि.8)-** जय, पराजय हा निवडणूकीचा भाग असला, तरी मी जेव्हा-जेव्हा निवडणूकीच्या रिंगणात उतरलो, तेव्हा-तेव्हा मतदारांनी मला प्रचंड आशीर्वाद दिले. त्यामूळे या मतदार राजाची सेवा करणे हे माझे सामाजिक दायित्व आहे. हे दायित्व पार पाडण्याची संधी देण्याकरिता मला तुम्ही आमदार बनवाल, असा विश्वास वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार डॉ.निलेश विश्वकर्मा यांनी व्यक्त केला. धामणगाव मतदारसंघात आशीर्वाद पदयात्रेदरम्यान मतदारांशी संवाद साधतांना त्यांनी आपले मत प्रकट केले.

डॉ. निलेश विश्वकर्मा हे गेल्या पंधरा दिवसांपासून मतदारसंघातील तिनही तालुक्यात आपली आशीर्वाद पदयात्रा काढत प्रचार करित आहेत. युवा आणि दमदार नेतृत्व म्हणून मतदार त्यांच्याकडे पाहत आहे. विशेषत- युवा वर्ग डॉ. नीलेश विश्वकर्मा यांच्याकडे आकर्षित होत आहे. गेल्या चाळीस वर्षापासून धामणगाव रेल्वे मतदारसंघावर भारतीय जनता पार्टी व काँग्रेसचे अधिराज्य आहे. मागील निवडणुकीत डॉ. नीलेश विश्वकर्मा यांचा निसटता पराभव झाला. परंतु यावेळी पुन्हा वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी पुन्हा त्यांच्यावर विश्वास दाखवित त्यांना उमेदवारी दिली. डॉ.नीलेश विश्वकर्मा हे गेल्या पाच वर्षापासून मतदारसंघात कार्यरत आहे. गोरगरीब जनतेच्या समस्या त्यांनी जाणून घेतल्या आहेत. कोरोना काळात डॉ. नीलेश विश्वकर्मा यांनी केलेले कार्य व युवा वर्गासाठी केलेली मदत या सर्व बाबीची जाण मतदारसंघातील युवा वर्गाने बोलून दाखविली आहे. सरकारच्या तिजोरीतून लाडकी बहिण योजना राबवून आता राज्यशासन विविध माध्यमाने नागरिकांकडून या पैशांची वसुली करित आहेत. त्यामूळे ही लाडकी बहिण योजना ही फसवी असल्याचे डॉ. नीलेश विश्वकर्मा यांनी मतदारसंघात प्रचार रॅलीदरम्यान मतदारांना समजावून सांगितले. सोयाबीनला भाव नसल्याने बेभाव विक्री केल्या जात आहे. या सर्व बाबीवर पुढील काळात गांभीर्याने लक्ष दिल्या जाईल, असे डॉ. नीलेश विश्वकर्मा यांनी मतदारांना सांगितले. मतदारांनी त्यांना प्रचंड प्रतिसाद देऊन यावेळी विधानसभेवर त्यांना पाठविण्याचे आश्वासन दिले आहे.

# प्रीती बंड, धाने पाटील,नागमोतेसह 7 जण ठाकरे गटातून निलंबित

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 8)-** बडनेरा मतदारसंघात महाविकास आघाडीचे शिवसेनेचे उमेदवार सुनील खराटे यांच्या विरोधात बंडखोरी करणाऱ्या प्रीती बंड आणि त्यांच्या समर्थकांना शिवसेना ठाकरे गटाने पक्षातून बाहेर काढले आहे. यामध्ये पक्षाच्या जिल्हा संघटक प्रीती बंड, जिल्हा समन्वयक ज्ञानेश्वर धाने पाटील आणि नाना नागमोते, युवासेना जिल्हाप्रमुख उमेश शहाणे, बडनेरा उपजिल्हाप्रमुख प्रवीण अळसपुरे, अमरावती तालुका प्रमुख आशिष धर्माळे आणि भातकुली तालुका प्रमुख मनोहर बुध यांचा समावेश आहे. शिवसेनेच्या मुख्य कार्यालयातून याबाबतचे पत्र जारी करण्यात आले आहे. नुकताच शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी अमरावती जिल्ह्याचा दौरा केला होता. त्याअंतर्गत दर्यापूर आणि



वलगाव येथे प्रचार सभांना संबोधित करण्यासोबतच उद्धव ठाकरे यांनी बडनेरा मतदारसंघात पक्षाचे उमेदवार सुनील खराटे यांच्या प्रचारासाठी रॅली व जाहीर सभा घेतली होती.उद्धव ठाकरे यांचा दौरा संपताच शिवसेनेच्या बंडखोर उमेदवार प्रीती बंड आणि त्यांच्या समर्थकांची पक्षातून हकालपट्टी करण्याचे आदेश शिवसेनेने काढले.

# विनायक खाडे यांना मातृशोक



मोर्शी- येथून जवळच असलेल्या आष्टगाव येथील सौ गिताबाई शंकरराव खाडे यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय 85 वर्षे होते. त्यांचे पश्चात पती, चार मुले, एक मुलगी, सुना व नातवंडे असा मोठा परिवार आहे. अंध विद्यालयाचे मुख्याध्यापक विनायक खाडे यांच्या त्या आई होत. त्यांचे अंत्ययात्रेला गावातील लोकांसह नातेवाईकांचा मोठा समुदाय होता.

# 70 हजार रुग्णाचे जीवन रक्षक ठरले बच्चु कडू

## दुर्धर आजारांवर मुंबईत मोफत शस्त्रक्रिया

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती (दि.8)-** स्वातंर्त्याच्या अमृत महोत्सवानंतर सुद्धा देशात आरोग्याचा प्रश्न अधिक भीषण झालेला आहे. शासनाच्या वतीने गोरगरीब रुग्णांसाठी महात्मा फुले आरोग्यदायी योजना राबविल्या जातात मात्र दुर्धर आजार असला की या योजनाही फोल ठरतात.अश्यातच अमरावती जिल्ह्यात 70 हजार रुग्ण दुर्धर आजाराने ग्रासले असतांना अश्यावेळी बच्चू कडू यांनी रुग्णांना जवळचा एक रुपया सुद्धा खर्च न येऊ देता लाखो रुपयांचा मोफत उपचार तोही मुंबईत करून दिला. त्यामुळे त्या 70 हजार रुग्णांसाठी बच्चू कडू आजही 'जीवन रक्षक' समजले जातात.सर्वसामान्य लोकांचे प्रतिनिधित्व करणारे नेते प्रत्यक्षात लोकप्रतिनिधी झाले की जबाबदाऱ्या विसरतात. आरोप, प्रत्यारोप आणि ईतर विषयात त्यांना जास्त रस असतो परंतु अचलपूर मतदार संघाचे आ.बच्चू कडू याला अपवाद असून प्रहार जनशक्ती पक्षाच्या माध्यमातून बच्चू कडू दरवर्षी दिव्यांग,



निराधार, गोरगरीब रुग्णांच्या दुर्धर आजारांवर त्यांना मुंबईत मोफत उपचार करून देतात. विशेष म्हणजे बच्चू कडू यांचे मुंबई येथील प्रहार रुग्णसेवक प्रताप तायडे, गोलू सुळे हे सर्व रुग्णांची काळजी घेऊन त्यांची मुंबईत सर्व व्यवस्था करून देतात.

बच्चू कडू जेव्हापासून लोकप्रतिनिधी आहेत तेव्हापासून आजपर्यंत अमरावती जिल्ह्यातील 70 हजार रुग्णांवर मुंबईतील टाटा मेमोरियल,अंबानी, रिलायन्स, कोकिळाबेन, हिंदुजा, भाटिया, लीलावती, जेजे नायर, केईएम, सैफी, ब्रीच कँडी,बॉम्बे हॉस्पिटल, एच.आर.सी.सी यांसारख्या महागड्या व आधुनिक सेवा असणाऱ्या रुग्णालयात हृदय शस्त्रक्रिया, कॅन्सर,ब्रेन, ट्युमर, किडनी, लिव्हर, गुडघे प्रत्यारोपण आदी असाध्य आजारांवर यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आल्या.7 लाख ते 40 लाख रुपये एवढा खर्च असलेला उपचार बच्चू कडू यांच्या माध्यमातून झाल्याने अनेक रुग्णांना आज जीवनदान मिळाले आहे. जिल्ह्यातील कोणत्याही गावात जर कोणत्या सामान्य व्यक्तीला दुर्धर आजार झाला तर त्या मतदार संघातील लोकप्रतिनिधींपेक्षा रुग्ण बच्चू कडू यांच्याशी किंवा प्रहार रुग्णसेवकांच्या मदतीने उपचार करून घेतात ही सत्य बाब आहे.बच्चू कडू यांची रुग्णवाहिका चळवळ सुद्धा यामध्ये सहभागी असून मतदार संघातील कोणत्याही गावात रुग्णांना रुग्णवाहिकेची मदत लागल्यास ती निशुल्क उपलब्ध करण्यात येते.

### निशुल्क रुग्णवाहिकेची रुग्णांना मदत

2004 पासून अविरत रुग्णवाहिका सेवा सुरू आहे.या रुग्णवाहिकेचे पहिले सारथी देविदास गोरले हे होते तर आज अचलपूर व चांदुर बाजार तालुक्यात तब्बल 12 पेक्षा अधिक रुग्णवाहिका कार्यरत आहेत.आजवर तीन हजार पेक्षा अधिक रुग्णांचे प्राण वाचविण्यात या रुग्णवाहिकांना यश मिळाले आहे. या सेवाकार्यात हेमंत कोंडे, झाबिउल्ला खान ,तुषार वानखेडे, उध्दव ठाकरे, प्रज्वल हडोले, नरेंद्र उइके, शशी भोंगाडे, शुभम धर्मे, राधे डकरे, अमोल शेळके, प्रशात नागपुरे या रुग्णवाहिका सारथींची मोठी मदत मिळत आहे.

### रुग्णसेवकांची प्रामाणिक सेवा

या आरोग्यसेवेमध्ये,शुभम भेंडे अमरावती,समर्थ डवरे अमरावती, रेहान अमरावती,उमेश खापरे नागपुर,प्रताप तायडे मुंबई,गोपाल सुळे मुंबई,विकास दांडगे वर्धा,गजु कुबडे वर्धा,अमोल आव्हाड सावगी मेघे या रुग्णसेवकांची प्रामाणिक सेवा मिळत आहे. रुग्णांच्या जेवणाच्या व निवासाच्या व्यवस्थेपासून तर सर्व शासकीय योजनांचा लाभ या रुग्णसेवकांच्या माध्यमातून सदैव रुग्णांना मिळतो.

# गुन्हे शाखेने पकडले 9.38 लाख

## धामणगाव रेल्वे, चांदूर रेल्वेमध्ये कारवाई



**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर रेल्वे, (दि.8)-** स्थानिक गुन्हे शाखेने शुक्रवारी (दि.8) धामणगाव रेल्वे, चांदूर रेल्वेमध्ये कारवाई करित 9.38 लाख रुपये जप्त केले. गुन्हे शाखेचे पथक नियमित गस्तीवर असतांना मिळालेल्या बातमी वरून धामणगाव रेल्वे येथे एका इसमास चेक केले असता त्याचे ताब्यात 5 लाख मिळून आले. सदर व्यक्तीस मिळालेल्या रकमेबाबत विचारणा केली असता त्याचेकडून समाधान कारक उत्तर प्राप्त न झाल्याने सदर रक्कम जप्त करण्यात आली. संबंधित व्यक्ती हा धामणगाव रेल्वे येथीलच रहिवासी आहे. तसेच चांदूर रेल्वे येथे एका इसमाच्या ताब्यात 4,38,000 रू. मिळून आले. त्याबाबत समाधानकारक उत्तर न मिळाल्याने ती रक्कम जप्त करण्यात आली आहे. सदर व्यक्ती मसानगंज, अमरावती येथील रहिवासी आहे. मिळालेल्या दोन्ही व्यक्तींकडे रोख रक्कमेच्या संबंधात असणारे पुरावे तपासून पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे.

# वरुडमध्ये तपासणी पथकाने पकडले सहा लाख रुपये

**महासागर प्रतिनिधी**

**वरुड -** विधानसभा निवडणूकीच्या अनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखेचे पथक नियमित गस्तीवर असतांना मिळालेल्या माहितीनुसार वरुड येथे संशयाच्या आधारावर एका इसमाची तपासणी केली असता त्याचे ताब्यात 6 लाख 37 हजार रुपये मिळून आले.



सदर व्यक्तीस मिळालेल्या रकमेबाबत विचारणा केली असता त्याचेकडून समाधानकारक उत्तर प्राप्त न झाल्याने सदर रक्कम जप्त करण्यात आली. संबंधित व्यक्ती हा काटोल जिल्हा नागपूर येथील रहिवासी असून त्याचे कडे रोख रक्कमे संबंधात असणारे पुरावे तपासून पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे.

# किसनराव भगत याचे निधन

**अंजनगाव बारी -** येथील जेष्ठ नागरिक किसनराव विठोबाजी भगत यांचे वयाच्या 82 वर्षी अल्प आजाराने (दि.7) सायंकाळी सात वाजता दु:खद निधन झाले. त्याच्या पश्चात दोन मुले, दोन मुली व नातवंडे असा बराच आप्तपरिवार आहे. श्री गुरुदेव मंडळाच्या माध्यमातून प्रसिद्ध ढोलकी वादक, भजन, किर्तनात पोथी वाचण्यात ह.भ.प. तसेच गावातील प्रत्येक धार्मिक कार्यक्रमांमध्ये सहभागी घेणारे तसेच समाजातील वैद्य तसेच सामाजिक कार्यकर्ते समाजसेवक म्हणूनही ते सर्वत्र सुपरिचित होते. त्यांनी आपले अखंड जीवन सेवेत घालवले ते न्यु एज्युकेशन सोसायटी बडनेरा चे सदस्य तसेच सभापती म्हणूनही कार्यरत होते.



# मेळघाटात थाट्याचे दिवाळी पर्व

## महासागर विशेष — घुंगरू बाजारात ढोलकी बासरीच्या स्वरात चुरणीत रंगले नृत्य





**मारोती पाटणकर**

**चुरणी,(दि.8) -** मेळघाटातील आदिवासींची संस्कृती वेगळी आहे. त्यांचे आपले वेगळे असे जग आहे. आदिवासी समाजात होळी हा सर्वात महत्त्वाचा सण असला तरी मेळघाटातील गायकी गोंड बांधव दिवाळी पर्वावर गुरांसोबत खेळण्यापासून तर बासरी ढोलकीच्या तालावर नृत्य करून सण साजरा करतात. दिवाळीच्या दुसऱ्या दिवशी पासून गावात नाच गाणे मनात सुरु झालेल्या या पर्वाला बुधवारी चुरणी पासून थाट्या वजा घुंगरू बाजारची सुरुवात झाली.

गुरुवारी काटकुंभ येथे बाजाराच्या दिवशी हा घुंगरु बाजार भरला. विविध गावात बाजाराच्या दिवशी या घुंगरु बाजाराचे आयोजन करण्यात येते. मेळघाटात गुराख्याला थाट्या म्हणतात. गायकी गोंड समाज बांधव मोठ्या प्रमाणात वर्षभर गावातील गुरे चारण्याचे काम करतात. मोबदल्यात पशुपालकांकडून वार्षिक आर्थिक व ठरलेला व्यमवहार असतो, त्यावर त्यांच्या कुटुंबाचा आर्थिक डोलारा चालतो. दिवाळी सणाच्या पर्वावर मेळघाटच्या पाड्यांमध्ये ढोल, बासरीच्या स्वरात थाट्यांचे थिरकणारे पाय आणि गावकऱ्यांची साथ उत्साहात भर घालणारी असते.

### पाच दिवस आराम

वर्षभर जंगलात व परिसरात गुरे चारणारे थाट्या दिवाळीच्या पाच दिवसात गावातील गुरे चराईसाठी नेत नाहीत हे विशेष कोरडा, कोयलारी, कोटमी, कोयलारी, बगदरी, काजलडोह, डोमा, बामादेही आदी गावात या प्रथेला बुधवार पासून सुरुवात झाली आहे.

### गोधनी काढून दिवाळी सण

गावातील गुरेढोरे वर्षभर चराई करीत असल्याने या मुक्या प्राण्याची त्यांचा लळा जिवापाड लागतो. दिवाळीच्या दिवशी पशु पालकाच्या घराच्या भिंतीवर चुन्याने रंगवून गेरूने गोधनी काढल्या जाते. त्या गुरांना थाटया कडून खिचडी खाऊ घातल्या जातो. मोबदल्याचा काही पशुपालक त्यांना सुपात घरातील धान्य देण्याची प्रथा आजही आहे.

### गेरू नंतर थाट्या बाजाराची धूम

दिवाळीच्या दुसऱ्या दिवसा पासून गावातून गुराखी ढोल, बासरी च्या तालात नाचगाणी करतात. त्याला गेरू असे म्हणतात. यानंतर तालुक्यात भरणाऱ्या मोठ्या आठवडी बाजारात थाट्या वजा घुंगरू बाजाराची धूम सुरु आहे. या बाजारात मोठया संख्येने हे समाज बांधव एकत्र येऊन नाचगाणे करतात मेळघाटची ही परंपरा बदलत्या संस्कृतीत आजही सुरू आहे.

# अजनी रेल्वे पुलाखाली अल्पवयीन युतीवर अत्याचार

## बिहारच्या युवकाला वरुडमधून अटक

**महासागर प्रतिनिधी**

**वरुड,(दि.8) -** नागपुरातील अजनी रेल्वे पुलाखाली अल्पवयीन मुलीवर अत्याचार करणाऱ्या आरोपीला वरुडातून अटक करण्यात आली आहे. तो बिहारला पळून जाण्याच्या तयारीत असताना अजनी पोलिसांनी त्याला बेड्या ठोकल्या.

धीरजकुमार (22) रा. बिहार असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. लग्नाचे आमिष दाखवून त्याने पीडित तरुणीवर अत्याचार केले. मात्र ती गरोदर असल्याचे उघड झाल्यानंतर हे बिंग फुटले. कंत्राटदाराकडून काही कामगार गेल्या आठ महिन्यांपासून अजनी रेल्वे स्थानकाच्या प्लॅटफार्म नंबर सात जवळ झोपडीत राहत आहेत. यातील पीडित तरुणी ही आई वडिलासह राहते. तर आरोपी धीरज कुमार हा सुध्दा कामगार



असून जवळपास राहत होता. ते प्लॅटफार्मच्या बांधकामावर काम करीत होते. कामानिमित्त दररोज भेट व्हायची. यातूनच दोघांचीही मैत्री झाली आणि ते एकमेकांच्या प्रेमात पडले. आरोपी धीरज कुमारने तिला प्रेमाच्या जाळ्यात ओढले. त्यांनी लग्नाच्या आणाभाका घेतल्या. धीरज कुमार संधी मिळताच अजनीच्या रेल्वे पुलाखाली तिच्यावर लैंगिक अत्याचार करायचा. दरम्यान मुलीच्या शरीरातील बदल बघून आई-वडिल तिला रूग्णालयात घेऊन गेले. ती पाच महिन्यांची गर्भवती असल्याचे डॉक्टरांनी सांगितले. तिच्या आई-वडिलांनी विचारपूस केली असता धीरज कुमारचे नाव पुढे आले. त्यांनी आरोपीला बोलाविले. लग्न करण्यासाठी विनवणी केली.

मात्र, लग्नाचे नाव ऐकताच तो पळाला. तो मी नव्हेच अशी भूमिका घेत होता. तरुणीच्या तक्रारीवरून लोहमार्ग पोलिसांनी आरोपी विरूध्द गुन्हा नोंदविला. पोलीस पथकाने त्याचे लोकेशन% काढले असता तो वरूडला असल्याचे समजले. पोलिसांनी वरूडहून त्याच्या मुसक्या आवळल्या. पोलिसांनी त्याला न्यायालयात उपस्थित केले. त्याने छट पूजा झाल्यानंतर लग्न करणार असल्याचे पोलिसांना सांगितले. मात्र तरुणीने गुन्हा दाखल करुन अटक करण्याची मागणी करीत त्याला धडा शिकवला.